भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५४८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०८/२०१७

**१) विद्युत प्रवाहाचा जबर शॉक लागुन गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २९/०८/२०१७ चे ०७.३० ते १९.०० वा. दर. आरोपी हा एमएसईबी भंडारा येथे वरीष्ठ तंत्रज्ञ यांनी आपल्या अधिनिस्त कर्मचारी जखमी सौ. संध्या पांडुरंग खोब्रागडे वय २८ वर्ष रा. भंडारा हिला विद्युत डि.पी. चे एलटी लाईन दुरूस्ती करीता विद्युत पुरवठा बंद आहे याची खात्री न करता दुरूस्ती करीता खांबावर चढविल्याने रोप ओढत असतांनी जखमीला विद्युत प्रवाहाचा जबर शॉक लागुन तिला गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. चाबुकस्वार यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. थेर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल हयगयीने चालवुन सिमेंट पोलला धडक मारून स्वत: व मागे बसणाऱ्या इसमास जखमी करण्यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

आरोपी चालकाने आपले ताबयातील बिना नंबरची मोटार सायकल ही भरधाव वेगाने, हयगयीने चालवुन रोडाचे वळणावरुन जोराने चालवुन रोडचे बाजुला असलेल्या सिमेंट पोलला धडक मारुन खाली पडुन स्वत: व मागे बसलेल्या फिर्यादी नोगेश बालाराम मडावी वय २७ वर्ष रा. भुराटोला जि. गोंदीया यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकल ३/१८१, १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोलंकी पो. स्टे. करडी हे करीत आहेत.

**३) साक्ष देण्याच्या कारणा वरून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद**

दिनांक ०२/०८/२०१७ चे १५.४५ वा. दर. यातील फिर्यादी मनोहर श्रावण दुर्गे वय ६१ रा. दिघोरी मोठी हा मा. उपविभागीय कार्यालय साकोली येथे साक्ष देण्याकरीता आला होता साक्ष देवुन कार्यालयाचे गेट समोर डांबरी रोडवर उभा असतांना, यातील आरोपीने फिर्यादीला 'माझ्या विरोधात साक्ष का दिली ' असे म्हणुन भांडण करून अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) अवैध दारू/जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक ०२/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे जवाहरनगर, सिहोरा, व आंधळगाव येथे अवैध दारू /जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून २० लिटर हा.भ. दारू किंमती १,०००/—रु. तसेच जुगारातुन कि.८,७६२/रु असा एकुन ९,७६२/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०२/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१ तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९९ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.